

छ.शिवाजी महाराज पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष होते: प्रा.कासार

पान : अ.नगर जिल्हा

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

www.prahaar.in epaper.prahaar.in

नाशिक ● रविवार, ८ जून २०२५

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष ४ ● अंक १०० ● पाने १२ (कोलाजसह) ● ₹ ४.००




नोवाक जोकोविचचा 'स्वप्न भंग'

**स्टेटलाइन**

उन्माद आणि बेपर्वाई...

# “राहुल गांधींचे आरोप हास्यास्पद”

## महाराष्ट्र विधानसभा निकालाबाबतचे केंद्रीय निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण




◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र विधानसभा निकालाबाबत काँग्रेस नेते, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांचे आरोप हास्यास्पद आहेत, असे स्पष्टीकरण केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहे.

गेल्या वर्षी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून गैरप्रकार करण्यात आला होता, असा दावा राहुल गांधी यांनी केला. या आरोपांना केंद्रीय निवडणूक आयोगाने चोख प्रत्युत्तर दिले असून, त्यांचे आरोप हस्यास्पद असल्याचे म्हटले आहे. निवडणूक आयोगाने पुढे म्हटले आहे की, राहुल गांधी यांचे आरोप कायद्याचा अपमान करणारे आहेत. तसेच, राहुल गांधींच्या आरोपांना निवडणूक आयोगाने दिलेले उत्तर निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर सार्वजनिकरीत्या उपलब्ध करण्यात आले आहे.

“महाराष्ट्रातील मतदार याद्यांवर उठवले जाणारे निराधार आरोप कायद्याच्या राज्याचा अपमान करणारे आहेत. निवडणूक आयोगाने २४ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेसला दिलेल्या उत्तरात ही सर्व तथ्ये समोर आणली होती, जी निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. असे दिसते की, असे मुद्दे वारंवार उपस्थित करताना या सर्व तथ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे,” असे निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या पत्रात म्हटले आहे.

निवडणूक आयोगाच्या या पत्रात पुढे असेही म्हटले आहे की, “कोणाकडूनही पसरवण्यात येणारी चुकीची माहिती केवळ कायद्याचाच अनादर नाही तर त्यांच्या राजकीय पक्षाने नियुक्त केलेल्या हजारो प्रतिनिधींची बदनामी करणारी आहे. असले प्रकार निवडणुकीदरम्यान पारदर्शकपणे काम करणाऱ्या लाखो निवडणूक कर्मचाऱ्यांना निराश करणारे आहेत. मतदारांच्या कोणत्याही प्रतिकूल निकालानंतर, निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचे आरोप करणे म्हणजे निवडणूक आयोगाची बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. जो पूर्णपणे हास्यास्पद आहे.”

### त्यांना खोटे बोलण्याची सवय लागली : देवेंद्र फडणवीस

■ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतांच्या टक्केवारी बाबत घेण्यात आलेल्या आक्षेपावर निवडणूक आयोगाने आकडेवारी सहप्रमाण दिले आहे. पण, काँग्रेस नेते राहुल गांधींना खोटे बोलण्याची सवय लागली आहे. ते खोटे बोलून स्वतःच्या मनाला समजावत आहेत. जोपर्यंत हे सत्य स्वीकारून जागे होऊन जमिनीवर काम करणार नाही तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलाही भवितव्य उरलेले नाही, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

■ राहुल गांधी यांच्या लेखाबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, राहुल गांधी यांनी बिहारमध्ये हार मानलेली आहे. पण राहुल गांधी जमिनीवर उतरणार नाहीत. स्वतःशीच खोट बोलणे सोडणार नाहीत, खोटे आश्वासनाने दिलासा देण्याचे सोडणार नाहीत, तोपर्यंत त्यांचा पक्ष कधीही निवडणुकीत जिंकणार नाही, त्यांना जागे व्हावे लागेल, वस्तुस्थिती समजून घ्यावी लागेल. अशा पद्धतीने खोटं ते नेहमी बोलत असतात, मतदारांचा अपमान करत असतात. राहुल गांधींनी महाराष्ट्राच्या मतदारांचा अपमान केला आहे. राहुल गांधी जे बोलतात ते त्यांनाही माहीत नसते ऐकणाऱ्या समजत नाही.

■ रोज खोटे बोलले की लोकांना खरे वाटते असे राहुल गांधींना वाटत आहे. त्यामुळे त्याच त्या गोष्टी सातत्याने बोलत असतात.



यापूर्वी देखील त्यांनी असा आरोप केलेला आहे. निवडणूक आयोगाने आकडेवारी सह प्रमाण दिले. स्वतःशी खोटे बोलून स्वतःला दिलासा देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत. आमच्या लाडक्या बहिणीचा अपमान राहुल गांधी करत आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

# भारतातील २७ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर

◆ **नवी दिल्ली (प्रतिनिधी) :**




■ जागतिक बँकेच्या नव्या अहवालातील माहिती

■ मोदींच्या विविध योजनांचे यश, महाराष्ट्राचा मोठा वाटा...

जागतिक बँकेच्या नव्या अहवालानुसार, भारताने मागील ११ वर्षांत (२०११ ते २०२२) २७ कोटी नागरिकांना अत्यंत गरिबीमधून बाहेर काढले आहे. हे भारताचे मोठे यश मानले जात आहे.

भारताने गरिबीविरुद्ध मोठं यश मिळवले आहे. या काळात गरिबी दर २७.१ टक्क्यांवरून घटून फक्त ५.३ टक्के इतका झाला आहे. ग्रामीण आणि शहरी भागात समान प्रमाणात गरिबी कमी झाली असून यात महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांचा विशेष वाटा आहे. मोदी सरकारच्या सरकारच्या प्रधानमंत्री आवास, उज्ज्वला, जनधन आणि आयुष्मान भारत या विविध योजनांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २०११-१२ मध्ये देशात सुमारे ३४ कोटी ४४ लाख लोक अत्यंत गरीब होते. २०२२-२३ मध्ये ही संख्या घटून सुमारे ७ कोटी ५२ लाख झाली. म्हणजेच २७ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले.

### बहुआयामी गरिबीतील घट

२००५-०६ मध्ये भारतात बहुआयामी गरिबी ५३.८ टक्के होती. २०१९-२१ मध्ये ती १६.४ टक्क्यांवर आली. २०२२-२३ मध्ये ती आणखी कमी होऊन १५.५ टक्के इतकी झाली आहे. जागतिक बँकेनुसार जे लोक दररोज ३ डॉलर (सुमारे २५० रुपयांपेक्षा) पेक्षा कमी खर्च करू शकतात, त्यांना अत्यंत गरीब मानले जाते. याच मोजमापानुसार २०११ मध्ये देशात २७ टक्के लोक अत्यंत गरीब होते. २०२२ मध्ये हे प्रमाण केवळ ५.३ टक्के राहिले आहे.

### गावे, शहरांमध्ये सुधारणा

गावांमधील गरिबांची संख्या १८.४ टक्क्यांवरून २.८ टक्के झाली आहे. शहरांमध्ये गरिबांची संख्या १०.७ टक्क्यांवरून १.१ टक्के झाली आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांमध्ये जास्त गरीब लोक होते. या राज्यांनी गरिबी कमी करण्यामध्ये मोठे योगदान दिले. या पाच राज्यांत २०११-१२ मध्ये देशातील ६५ टक्के अत्यंत गरीब लोक राहत होते. या राज्यांनी गरिबी हटवण्याच्या एकूण प्रगतीत दोन तृतीयांश योगदान दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात, केंद्र सरकारने विविध योजनांद्वारे गरिबी दूर करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले. घरासाठी- प्रधानमंत्री आवास योजना, मोफत गॅस सिलिंडरसाठी- उज्ज्वला योजना, बँक खात्यासाठी- जनधन योजना, मोफत उपचार, आरोग्यविमा यासाठी- आयुष्मान भारत, पैसे थेट खात्यात जमा होण्यासाठी-डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर योजना अशा अनेक योजनांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले. याशिवाय डिजिटल समावेश आणि आधार-पारदर्शकता वाढली. ग्राम पातळीवरील पायाभूत सुविधा-रोजगार आणि सुविधा वाढल्या. सरकारच्या म्हणण्यानुसार, याच पावलांमुळे २५ कोटींहून अधिक भारतीय गरिबीतून बाहेर पडू शकले.

## वेचक

### वक्फ संपत्तीच्या नोंदीसाठी ‘उम्मीद’ पोर्टल सुरू

**नवी दिल्ली :** वक्फ संपत्तीचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासह त्याची नोंद ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून ‘उम्मीद’ नावाचे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. नियमानुसार सहा महिन्यांच्या आत वक्फ संपत्तीची नोंदणी या पोर्टलवर करावी लागेल. वक्फ संपत्तीच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्याच्या आनुषंगाने हे पोर्टल सुरू करण्यात आल्याचे अल्पसंख्याक खात्याचे मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितले. सर्व वक्फ संपत्तींच्या विश्वस्तांना वक्फ संपत्तीबाबत ‘उम्मीद’ पोर्टलवर सहा महिन्यांत नोंदणी करावी लागेल.

### फरार उद्योगपती मेहुल चोक्सी सेबीच्या रडारवर

**नवी दिल्ली :** नीरव मोदीनंतर आता मेहुल चोक्सींची घेराबंदी सेबीने केली आहे. सेबी एजन्सीने उद्योगपती आरोपी मेहुल चोक्सीची सर्व संपत्ती ताब्यात घ्यायला सुरुवात केली आहे. सेबीने चौकसीचे सगळी बँक खाती, लॉकर, इतर मालमत्ता ताब्यात घेतली आहे. 'गीतांजली जेम्स' प्रकरणात इनसायडर ट्रेडिंग प्रकरणात फरार आरोपी नीरव मोदीचा काका मेहुल चोक्सी परदेशात फरार असले तरी २०११ ते २०१८ या काळात पंजाब नॅशनल बँकेच्या बनावट 'लेटर ऑफ अंडरटेकिंग' प्रकरणी मेहुल चौकसी अडचणीत आले.

### भारताने २९ देशांना दिली त्सुनामी इशारा यंत्रणा

**नवी दिल्ली :** वर्ष १९९९ मधील महा-चक्रीवादळ आणि २००४ मध्ये आलेली त्सुनामी यांसह भारतावर कोसळलेल्या विनाशकारी आपत्तींच्या अनुभवांचे स्मरण करून देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताने आपत्तीप्रवण प्रदेशांमध्ये वादळापासून वाचवणारे निवारे उभारून तसेच २९ देशांना उपयुक्त ठरणारी त्सुनामी इशारा यंत्रणा दिली आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेत सांगितले.



### रशियाचा युक्रेनवर पुन्हा तुफान हल्ला

**मास्को :** रशिया आणि युक्रेन दरम्यान सुरू असलेले युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे. युक्रेनने रशियावर केलेल्या हल्ल्याचा बदला व्लादीमीर पुतिन यांनी शुक्रवारी घेतला. त्यानंतर शनिवारीसुद्धा युक्रेनवर तुफान हल्ले रशियाने केले. यामध्ये ४०० पेक्षा जास्त ड्रोनने हल्ले करण्यात आले. त्यामुळे युक्रेनच्या अवकाशात अनेक स्फोट होताना दिसत होते.

## छत्तीसगडमध्ये ७ नक्षलवाद्यांचा खात्मा; ९५ लाखांचे इनाम असलेले दोन कुख्यात नक्षलवादी ठार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** छत्तीसगडमधील बीजापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार नक्षलविरोधी मोहिमेमध्ये गेल्या तीन दिवसांत किमान सात नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचे दोन महत्त्वाचे नेतेही ठार झाले असून, ही घटना राज्यासाठी आणि देशासाठी नक्षलवादविरोधी मोहिमेतील मोठा टप्पा मानली जात आहे. ही मोठी कारवाई बीजापूर जिल्ह्यातील घनदाट इंद्रावती नॅशनल पार्क क्षेत्रात सुरू आहे. या भागात सुरक्षा दलांनी ७ मृतदेह हस्तगत केले असून त्यामध्ये माओवादींच्या सेंट्रल कमिटीचा सदस्य नरसिंह चाळम ऊर्फ सुधाकर आणि तेलंगणा राज्य समितीचा विशेष विभाग सदस्य भास्कर ऊर्फ मईलारापू अडेल्लू यांचा समावेश आहे. सुधाकरवर ₹४० लाखांचे इनाम होते, तर भास्करवर छत्तीसगड आणि तेलंगणा सरकारकडून मिळून ₹४५ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

## आता नौदलाची वाढणार सागरी ताकद!



### देशातील पहिली ‘अर्नाळा सबमरीन’ सज्ज

**विशाखापट्टणम :** भारतीय विशाखापट्टणम येथील नेव्ही अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट (एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी) अर्नाला नौदल १८ जून रोजी डॉकयार्ड येथे देशातील पहिले कमिशनिंग करणार आहे. कमिशनिंग समारंभाचे प्रमुख पाहुणे सीडीएस जनरल अनिल चौहान असणार आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील वसई येथील ऐतिहासिक अर्नाळा किल्ल्यावरून त्याचे नाव देण्यात आले आहे. हे जहाज हिंदी महासागरात नौदलाच्या मजबूत उपस्थितीसाठी डिझाइन केले आहे.

## शैक्षणिक दाखले, शपथपत्रासाठी स्टॅम्पपेपरची मागणी नियमबाह्य

◆ **मुंबई(प्रतिनिधी) :**




**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अधिकाऱ्यांना तंबी**

शासकीय कार्यालयातील ई सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी १०० अथवा ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबाह्य असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांकडून स्टॅम्पपेपरची मागणी करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना पत्र लिहून दिली आहे.

बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना पत्र पाठविले आहे. या पत्रात विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दोन महिन्यापूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत. शासकीय कार्यालये प्रमाणपत्रांसाठी आणि न्यायालयात सादर होणाऱ्या शपथपत्रासाठी आता स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे.

साध्या कागदावर स्वयं-प्रमाणित शपथपत्र सादर करणे पुरेसे आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना, विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्टॅम्प पेपरवरील खर्चातून मोठा दिलासा मिळत आहे. तथापि, काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने स्टॅम्पपेपरची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी येत असल्याने बावनकुळे यांनी कानाडोळा सोडा आणि जनतेला दिलासा द्या, अशा शब्दांत अधिकाऱ्यांना बजावले आहे.

> "हा निर्णय सामान्य माणसाच्या हिताचा आहे. २००४ पासून ही सवलत लागू आहे. वारंवार सरकारच्या वतीने याबाबत सांगण्यात येते. तरीही जिल्हा आणि तालुका प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार असेल, तर कारवाई केली जाईल. सर्वसामान्य जनतेला अकारण वेठीस धरणाऱ्यांना माफी नाही."
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे**

### लष्कराच्या रेजिमेंटमध्ये ४०२ अग्निवीरांचा समावेश

**नवी दिल्ली :** लष्करातील अग्निवीरांच्या पाचव्या कोर्सच्या पासिंग आउट परेड पूर्ण झाल्यानंतर, या बॅचमधील सर्व ४०२ अग्निवीरांचा लष्कराच्या डोगरा रेजिमेंटमध्ये समावेश करण्यात आला आहे. अग्निवीरांची संपूर्ण पाचवी बॅच या रेजिमेंटच्या विविध शाखांमध्ये तैनात करण्यात आली आहे. लष्करातील अग्निवीर भरतीच्या नवीन प्रणालीअंतर्गत, या बॅचचा कोर्स देखील डोगरा रेजिमेंटने आयोजित केला होता आणि त्यांचा पासिंग आउट परेड आणि पडताळणी समारंभ ४ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. लष्कराच्या मते, या बॅचमध्ये एकूण ४०२ अग्निवीर उत्तीर्ण झाले आणि त्यांनी भारतीय सैन्याचा भाग म्हणून शपथ घेतली.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत होणार

◆ **मुंबई (वृत्तसंस्था) :**

■ येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात मतदान

■ राज्य निवडणूक आयुक्तांनी दिली माहिती

■ महापालिका आणि जिल्हा परिषदेसाठी पॅनल पद्धत रद्द

■ प्रत्येक प्रभागनिहाय निवडणूक

■ निवडणूक खर्चात वाढ करण्याबाबतही विचार

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम तीन टप्प्यांत घेण्याचे विचाराधीन असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जातील, असेही त्यांनी सांगितले. अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी झालेल्या सुनावणीवेळी दिले होते. त्यामुळे निवडणुका ऑक्टोबरपर्यंत घेण्याचा आयोगाचा मानस आहे. एकाच टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ लाख ५० हजार ईव्हीएमची गरज भासणार आहे. मात्र, राज्य निवडणूक आयोगाकडे फक्त ६५ हजार ईव्हीएम आहेत. म्हणूनही तीन टप्प्यांत निवडणूक घेण्याची तयारी आयोग करत आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात येत्या १८ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. त्यावेळी निवडणूक घेण्यासाठी मुदत वाढवून देण्याची मागणी न्यायालयाकडे करणार असल्याचेही वाघमारे यांनी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य निवडणूक आयोगाने महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. राज्य सरकारकडून लवकरच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रभाग रचना अंतिम केली जाईल. प्रभाग रचना २०११ च्या लोकसंख्येनुसार होईल. महापालिकेसाठी संबंधित आयुक्त, तर नगरपालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून ही प्रक्रिया पार पाडली जाईल. प्रभाग रचना झाल्यानंतर आरक्षण सोडत आणि त्यानंतर मतदारयादी अंतिम केली जाईल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर निवडणूक कार्यक्रम घोषित होईल. या दरम्यान, आपण स्वतः विभागनिहाय दौरा करून विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन निवडणूक पूर्व तयारीचा आढावा घेणार असल्याचे वाघमारे म्हणाले.

## भारताला पहिले तेजस एमके-१ ए जूनमध्येच मिळणार



◆ **नाशिक (प्रतिनिधी) :**

भारतीय हवाई दलाला पहिले स्वदेशी तेजस एमके-१ ए लढाऊ विमान जून २०२५ मध्येच मिळणार आहे. नाशिक जिल्ह्यात हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड कंपनी दर वर्षी २४ या गतीने तेजस एमके-१ए लढाऊ विमानांची निर्मिती करणार आहे. पहिले स्वदेशी तेजस एमके-१ ए लढाऊ विमान जून अखेरपर्यंत भारतीय हवाई दलाला मिळेल. भारतीय हवाई दलाने ८३ तेजस एमके-१ ए लढाऊ विमानांसाठी हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड कंपनीशी ४८ हजार कोटी रुपयांचा करार केला आहे.

तेजस एमके-१ ए हे हलक्या वजनाचे अत्याधुनिक लढाऊ विमान आहे. आकाशातून आकाशात, आकाशातून जमिनीवर तसेच पाण्यावर आणि खोल पाण्यात हल्ले करण्यासाठी तेजस एमके-१ ए लढाऊ विमान सक्षम आहे.

## बलुचिस्तानात सैन्याला मिळाले बेफाम अधिकार

◆ **इस्लामाबाद (वृत्तसंस्था) :**

### सर्वसामान्यांविरोधात पाकिस्तानात बनला कठोर कायदा

पाकिस्तानसारखा देश आपल्याच देशातील लोकांवर अत्याचार करण्यासाठी ओळखला जातो. बलुचिस्तानात सैन्याला होणारा तीव्र विरोध पाहता आता विधानसभेत असं विधेयक पारित करण्यात आले आहे. ज्याने माणुसकीला काळिमा फासला आहे. बलुचिस्तान विधानसभेत काऊंटर टेररिजम (बलुचिस्तान अमेंडमेंट) विधेयक २०२५ ला हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे. या कायद्यानुसार पाकिस्तानी सैन्याला कुणावरही संशय असेल तर त्याला तातडीने अटक करण्याचा अधिकार दिला आहे.

या विधेयकात शंकेच्या आधारे अटक करण्याची परवानगी दिली त्याशिवाय संबंधित व्यक्तीला ३ महिने त्यांच्या ताब्यात ठेवले जाऊ शकते. त्यासाठी संशयितावर कुठलाही आरोप सिद्ध होण्याचीही गरज नाही. याबाबत कायदे विश्लेषकांनी सांगितले की, पाकिस्तानातील हा कायदा बलुचिस्तानातील लोकांना टार्गेट करण्यासाठी बनवला गेला आहे. या कायद्यानुसार जॉईंट इन्वेस्टिगेशन टीमला बेफाम अधिकार मिळाले आहेत. आता ही टीम कुणालाही त्यांच्या ताब्यात घेण्याचे आदेश जारी करू शकते. कायद्यात सैन्याला अमर्याद अधिकार दिले आहेत, असे त्यांनी सांगितले. त्याशिवाय सर्वसामान्यांच्या समस्या आणि कायदेशीर हालचाली यावर देखरेख ठेवण्याचे अधिकारही सैन्याला सोपवण्यात आले आहेत. बलुचिस्तान पुलिसिंग आणि सैन्य अभियान यांच्यातील अंतरही या कायद्यामुळे संपले आहे. तपास यंत्रणांना शोध मोहीम राबवणे, अटक करणे, मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

## रशियाने देऊ केला राजकीय आश्रय

# एलॉन मस्क यांच्यावरून ट्रम्प - पुतिन यांच्यात जुंपणार?

◆ **वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :**

टेस्ला कंपनीचे सीईओ आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील तणाव चांगलाच वाढला आहे. रशियातील खासदार दिमित्री नोविकोव्ह यांनी मस्क हे रशियात राजकीय आश्रय घेऊ शकतात असे सूचक विधान केले आहे. ट्रम्प आणि मस्क यांच्या उघडपणे आरोप-प्रत्यारोप केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टेट ड्यूमा कमिटी ऑन इंटरनॅशलम अफेअर्स (कम्युनिस्ट पार्टी ऑफ द रशियन फेडरेशन) चे पहिले उपाध्यक्ष असलेल्या नोविकोव्ह यांनी हे विधान केले आहे.

रशिया एडवर्ड स्नोडेनप्रमाणे एलॉन मस्क यांना राजकीय आश्रय देईल का? असा प्रश्न माध्यमांकडून विचारण्यात आला होता. “मला वाटतं की मस्क यांचा गेम पूर्णपणे वेगळा असून त्यांना कोणत्याही राजकीय आश्रयाची आवश्यकता भासणार नाही, जरी त्यांना तशी गरज वाटली तर नक्कीच रशिया ते देईल,” असे उत्तर नोविकोव्ह यांनी दिले.

त्यांनी असेही नमूद केले की मस्क यांनी गेल्या काही वर्षांत एक प्रकारचा राजकीय संवाद निर्माण केला आहे ज्यामुळे वैयक्तिक मतभेद हे वेगळ्या प्रकारचे मतभेद राहतील.

या घडीला, तीन वर्षांत डेमोक्रॅटीक पक्ष व्हाईट हाऊसमध्ये परत यावा हे मस्क यांच्यासाठी आवश्यक आहे असे मला वाटत नाही आणि तेही त्याचे स्वागत करण्यासाठी तयार नाहीत. म्हणून सध्या यामध्ये काही डावपेचांचे फरक आहेत आणि काही धोरणात्मक गोष्टी आहेत आणि त्यांचे ते पालन करत राहतील, असे मला वाटते, असेही नोविकोव्ह पुढे बोलताना म्हणाले.




### मस्क यांच्यावर टीका

व्हाईट हाऊसचे माजी रणनितीकार स्टीव्ह बॅन्नन यांनी मस्क हे एक बेकायदेशीर एलियन आहेत, ज्यांना अमेरिकेतून हद्दपार केले पाहिजे. तसेच बॅन्नन यांनी अमेरिकन सरकारने अब्जाधीश एलॉन मस्क यांची कंपनी स्पेएक्स हे देखील जप्त केली पाहिजे असेही म्हटले होते. या विधानानंतर दिमित्री नोविकोव्ह यांनी यावर भाष्य केले.

## मुकेश अंबांनी यांनी दिली १५० कोटी रुपयांची गुरुदक्षिणा!

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

प्रसिद्ध उद्योजक आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी त्यांच्या मातृसंस्थेला म्हणजेच आयसीटी मुंबईला १५१ कोटी रुपयांची देणगी जाहीर केली आहे. ही देणगी त्यांनी 'गुरुदक्षिणा' म्हणून प्रा. एम. एम. शर्मा यांच्या आदेशानुसार दिल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे औचित्य होते प्रा. शर्मा यांच्या जीवनावर आधारित 'डिवाईन सायन्टीस (Divine Scientist)' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन समारंभात बोलताना अंबानी यांनी सांगितले की, "प्रा. शर्मा यांनी केवळ शिक्षण आणि संशोधनात योगदान दिले नाही, तर भारताच्या आर्थिक सुधारणांच्या दिशेनेही शांतपणे, पण प्रभावीपणे काम केले. त्यांनी धोरणकर्त्यांना समजावून सांगितले की, भारतीय उद्योगांना परवाना-परमिट-राजमधून मुक्त केल्यासच आपल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करता येईल."



### शिक्षकांच्या प्रेरणेसाठी अभूतपूर्व योगदान

### रिलायन्सकडून शैक्षणिक उपक्रमांना मोठी मदत

रिलायन्स इंडस्ट्रीजने यापूर्वी आयआयटी मुंबईसारख्या शैक्षणिक संस्था आणि संशोधन केंद्रांसाठीही आर्थिक मदत केली आहे. रिलायन्सने डिजिटल शिक्षण व तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्रात डिजिटलीकरणासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. मुकेश अंबानी पब्लिक स्कूल ही मुंबईतील खासगी शाळा मुकेश अंबानी यांच्या नावावर असून येथे उत्कृष्ट शिक्षणासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.